ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# छत्रपती राजर्षी शाहु महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास

**प्रा.सुरेंद्र सुंदरराव तांदळे**

*कला महाविद्यालय नांदुर (घाट) ता. केज जि.बीड*

**प्रस्तावना :**

छत्रपती राजर्षी शाहु महाराज हे एक आदर्श राज्यकर्ते होते. ज्या राजांनी समाजातील गोरगरीब दीन-दलित, मागासवर्गीय, उपेक्षित व आर्थिक दृष्टया दुर्बल यांच्या सर्वांगिण विकासाला अतिशय प्राधान्य दिले. त्यात छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे नांव आग्रणी घेतले जाते. दलित समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थानात आरक्षण त्यांनी अस्पृश्यता निवारण, जातिभेद निर्मलुन, बलुतेदारी पध्दतीवर बंदी, स्त्री शिक्षण, महिला संरक्षण कायदा, देवदासी प्रथेचे उच्चाटन, विधवा पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन या सारखे समाज उपयोगी निर्णय आमलात आणले.

**छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक योगदान :-**

१. उद्दिष्ट :- छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

२. विषयाची व्याप्ती :- छत्रपती राजर्षी शाहु महाराजांच्या कालखंड एवढी व्याप्ती शोध निबंधाची राहील. (२६ जुन १८७४ ते ५ मे १९२२)

३. संशोधन पध्दती :- या शोध निबंधाचा विषय पुनर्रावलोकन व पुनर्विश्लेषणात्मक असल्याने या शोध निबंध लेखनासाठी ऐतिहासिक संशोधनातील संदर्भ पध्दतीचा वापर करून शोध निबंधाचे लिखान करण्यात आले आहे.

छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी हे ओळखले होते की, कुठल्याही समाजाच्या सर्वांगीण विकास

करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणुन सर्वात महत्वाचे काम केले असेल तर ते म्हणजे कोल्हापुर संस्थानासाठी इ.सन १९१७ साली प्राथामिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करणारा कायदाच केला या साठी एक लाख रूपये खर्च करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. त्यापैकी ८० हजार रूपये दरबार खजिन्यातुन व २० हजार रूपये देवस्थान फंडातुन खर्च करण्यात आले.

देवस्थानाचा पैसा प्राथामिक शिक्षणाकडे वळविणारे छत्रपती राजर्षी शाहु राज पुरूष होते. पंढरपुर येथील अन्न छत्रासाठी कोल्हापुर दरबारातुन दरमहा एकशे आठ आणे जात असत. महाराजांनी ते अन्न छत्रासाठी दिले. जाणारे रूपये मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेला देण्याचा निर्णय ऑक्टोबर १९२० च्या आदेशान्वयेच घेतला. अन्नदानापेक्षा विद्यादान श्रेष्ठ आहे असे महाराजांना वाटत होते. कारण शिक्षण घेतलेला माणुस अन्नादानासाठी वणवण भटकणार नाही असे छत्रपती राजर्षी शाहु महाराजाचे मत होते.

प्राथामिक शिक्षण सक्तीचे केल्यानंतर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविणार नाहीत त्यांना दर महीना प्रत्येकी एक रूपया दंड करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला यावरून आपल्या असे लक्षात येते की, शाहु महाराजांना शिक्षणाच्या प्रसाराची किती तळमळ होती. हे लक्षात येते. शाहु महाराज ज्या वेळेस इंग्रज सरकारचा गुजरात, मुंबई, सिंध, कर्नाटक, प्रांताच्या शिक्षणावरील खर्च एक लाख रूपये होता. म्हणजे महाराज हे शिक्षणाबाबत किती दुरदृष्टी होते हे लक्षात येते.

छत्रपती शाहु महाराजांनी अभ्यासक्रम तयार करण्यापासुन शिक्षकांना प्रशिक्षण देणे. शाळा तपासणी अशी व्यवस्था निर्माण केली. गाव पाटलाने नियमित शाळा तपासुन तसा अहवाल पाठविण्याची योजना महाराजांनी केली.

गावातील शिक्षण संपल्यानंतर कोल्हापुर येथे सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी एक वसतीगृह सुरू केले. पण तो प्रयोग यशस्वी न झाल्यामुळे छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे सुरू केली. १८ एप्रिल १९०१ रोजी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिग, जैन बोर्डिग, त्यानंतर मुस्लीम, पांचाळ,दलित,सुतार,प्रभु, लिंगायत, शैव, कोष्टी इ. २० जातीधर्माची वसतीगृहे महाराजांनी कोल्हापुर येथे सुरू केली त्यामुळेच कोल्हापुरला त्या काळात वसतीगृहाचे शहर म्हणुन ओळखले जात असे. १८९९ साली वडगांवच्या पांडुरग पाटील मॅट्रीक उत्तीर्ण झाल्याचे समजल्याबरोबर महाराजांनी त्यांना पन्हाळगडावर बोलावुन त्यांचा सत्कार केला व त्यांला उच्च शिक्षणासाठी मदत केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पी.सी पाटील यांना शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्यासाठी सढळ हाताने मदत केली तर प्राचार्य सी.आर तावडे यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविले. भाई माधवराव बागल यांना जे.जे आर्ट स्कुल येथे शिक्षणासाठी पाठविले.

महाराजांनी मद्रास येथे डॉ. नायर मेमोरीयल स्कॉलरशिप साठी ५ हजार रूपये दिले तर पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ताराबाई मराठा बोर्डिग, नाशिक येथील श्री.उदाजी मराठा बोर्डिग, सोमवशीय समाज बोर्डीग नागपुर येथील चोखामोळा बोर्डीग वाराणसी येथील बनारस हिंदु विद्यापीठ इ. संस्थांना भरघोस आर्थिक मदत केली. दर्जेथर शिक्षण मिळावे यासाठी पुणे येथे श्री. शिवाजी मिलीटरी स्कुल राजर्षी शाहु महाराजांच्या प्रेरणेच स्थापन झाले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे फर्ग्युसन महाविद्यालय, राजर्षी शाहु महाराजांच्या सहकार्याने सुरू झाले. आज हयात डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पथसिध्द अध्यक्ष कोल्हापुरचे छत्रपती राजर्षी शाहु महाराजच आहेत.

राजाराम महाविद्यालयात मुलींच्या मोफत शिक्षणाची सुविधा शाहु महाराजांनी केली. कृष्णाबाई केळकरांना महाराजांनी वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबई मेडिकल कॉलेज मध्ये पाठविले त्या पुढे कोल्हापुर एडवर्ड मेमोरीएल हॉस्पीटल मध्ये वरिष्ठ वैद्यकीय आधिकारी झाल्या महाराजांनी राजपरीवाराचा विरोध झुगारून सुनेला म्हणजे इंदुमती देवीला शिक्षण दिले. कोल्हापुरात फिमेल ट्रेनिंग स्कुलची स्थापना केली. महाराजांनी कन्या आक्का साहेब यांच्या विवाहप्रित्यर्थ प्रत्येकी ४० रूपयांच्या एकुण ५ शिष्यवृत्या इ.४ थी वार्षिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येत होत्या. शाहु महाराजांचे १९२० (खामगाव जिल्हा बुलढाणा) येथील मराठा शिक्षण परिदषेतील भाषण अत्यंत कमी वयातील डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ऐकले. महाराजांच्या प्रेरणेतुनच त्यांनी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेची स्थापना करणे शिक्षण महर्षी कर्मवीर भाउराव पाटील हे तर राजर्षी शाहु महाराजांच्या राजवाडयावर राहुनच शिकले. कर्मवीर भाउराव पाटील यांनी राजर्षी शाहु महाराजांची प्रेरणा घेउन शिक्षणाचे काम निःस्वार्थपणे केले.

**निष्कर्ष :**

१. छत्रपती राजर्षी शाहु महाराज एक आदर्श राजा होते.

२. म.फुले यांचा शिक्षणाचा वारसा पुढे राजर्षी शाहु महाराजांनी चालविला.

३. छत्रपती राजर्षी शाहु महाराज शिक्षण तज्ञ होते.

४. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी प्राथामिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी कायदा केल्याचे आपणास दिसुन येते.

५. देवस्थानासाठी दिले जाणारे रूपये (पैसा) त्यांनी शिक्षणाकडे वळविला.

६. राजर्षी शाहु महाराजांनी परदेशात शिक्षण घेण्यासाठी अनेक तरुणांना मदत केली.

७. वेगवेगळया जाती धर्माच्या विर्द्याथ्यासाठी वेगवेगळया बोर्डीग काढल्या.

८. अनेक शैक्षणिक संस्थांना राजर्षी शाहु महाराजांनी सढळ हाताने मदत केली.

९. छत्रपती शाहु महाराजांनी स्त्रीयांच्या शिक्षणावरही भर दिलेला दिसुन येतो.

१०. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांची प्रेरणा घेवुन डॉ. पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाउराव पाटील यांनी शिक्षणाचे काम निःस्वार्थपणे केले.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

*डॉ पवार जयसिंग, राजर्षी शाहु महाराज स्मारक ग्रंथ, म.इति.प्रबोधिनी कोल्हापुर, प्रथमावृत्ती २९ मे २००९.*

*कोकाटे श्रीमंत शिवाजी, सवर्णाच्या आरक्षणाचे गौडबंगाल तथा मराठयांच्या आरक्षणाचे क्रुर राजकारण, जिजाउ प्रकाशन पुणे ३० प्रथमावृत्ती २००७*

*कीर धनंजय, राजर्षी शाहु छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई-२००९*

*कीर धनंजय, शाहु महाराज व्यक्तीमत्व आणि विचार,*

*संपा, साळुंके पी.बी. राजर्षी शाहु, गौरव ग्रंथ.*

*शिंदे, मा.श्री.भारतातील विद्यार्थी वसतीगृहाचे आद्यजनक.*

*लोकराज्य, राजर्षी शाहु महाराज राज्य रोहन शताब्दी विशेषांक,१ ऑगस्ट १९९४ विविध लेख.*

*बागलभाई माधवराव, शाहु महाराजांच्या आठवणी व्दि.आ,१९५०*

*बागलभाई माधवराव, शाहु महाराजांच्या आठवणी प्र.आ.२००४*

*सौ.पवार वसुधा समाज क्रांतीकारक राजर्षी शाहु छत्रपती.*

*प्राचार्य भगत रा.तु., जीवन व शिक्षण व कार्य.*

*आद्य संपा.शिंदे श्री.ल.,विजयी मराठा, राजर्षी शाहु खास अंक १९२३, विजयी मराठा प्रकाशन कोल्हापुर, व्दितीय आवृत्ती २६ जुन २००७*

*घाडगे रा.राजर्षी शांहुच्या स्फुर्ती कथा, चैतन्य प्रकाशन कोल्हापुर प्र.आ.२१ ऑक्टो २००६*